# पक्षांतर बंदी कायदा :- तत्व आणि व्यवहार

प्रा. डॉ. डोंगरे एल. बी.
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड (महाराष्ट्र).

**प्रस्तावना:-**

भारतीय लोकशाहीत राजकीय पक्ष हा महत्त्वाचा घटक आहे. राजकीय पक्ष हे लोकशाहीस मजबुत व प्रगल्भ बनवतात. पण याच राजकिय पक्षामुळे पक्षांतर ही मोठी रार्जकिय समस्या निर्माण केल्याचे दिसुन येते म्हणून पक्षांतर हे कायदेमंडळ न्यायमंडळ आणि सामान्य जनता यांच्या समोर आव्हान उभे केले आहे.

पक्षांतर म्हणजे एका राजकिय पक्षातुन दुसऱ्या रा. पक्षात कायदेमंडळाच्या सदस्याने प्रवेश करणे होय. पक्षांतरामुळे लोकतंत्र हे नोटतंत्र बनत आहे. या बाबत चव्हान समितीने असे म्हटले होते कि च दि कोई व्यक्ती किसी राजनीतीक दलसे सुरक्षीत चुनाव चिन्ह पर संसद के किसी सदन अथवा किसी राज्य या विधानसभा का सदस्य निर्वाचित होने के पश्चात स्वेच्छासे उस राजनितीक दल से संबध तोडता है और उसका सहकार्य उसके दल के किसी सामुहिक निर्णय का परिणाम नही होतो ऐसी करना दल - बदल कहलाएगा |

पक्षांतर या बाबत सुभाष कश्यप असे म्हणतात कि. जब कोई विधायक व्यक्तिगत रुप से अथवा सैद्धांतिक मतभेदो के कारण अपने दल से त्याग - पत्र दे देता है या नया रार्जनितिक दल बना देता है या दल कि सदस्यता का त्याग किए बिना हि उस दल के विरुद्ध सदन में मतदान करता है तो उसे रार्जनितीक दल- बदल करते है |

दल- बदलाची सुरुवात राष्ट्रीय स्वातंत्र्य लढण्यात स्थापन झालेल्या राष्ट्रीय काँग्रेस चा पक्षाच्या स्थापने पासुनच झाली असे मानले तर वादगे होणार नाही. सन. 1885 मध्ये डॉ. हयुम यांच्या नेतृत्वाखाली.

राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. मवाळ गटाचे नेते नामदार गोखले होते तर जहालगटाचे नेते लोकमान्य टिळक होते. राष्ट्रीय सभेत दोन गट निर्माण झालेले होते. पुढे चालुन राष्ट्रीय सभेतुन अनेक सदस्यांनी वेगवेगळया विचारधारेवर अधारीत राजकीय पक्षांची निर्मीती केली त्यामध्ये मुस्लीम लिंग. स्वराज्य पक्ष, कम्युनिस्टपक्ष, जनसंघ, प्रमुख मानावे लागतील.

प्रस्तुत शोध निबंधात भारतीय लोकशाही पक्षांतराचे राजकसरण व घटनादुरूस्ती यावर टाकण्याचा प्रयन्त करण्यात आलेला आहे. यामध्ये पक्षातराची कारणे, त्यांचे परिणाम व उपाय या वर दृष्टिअेप टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधन समस्या :-**

भारतीय लोकशाहीतील पक्षांतर बंदी कायदा - तत्व आणि व्यवहार या शोध निबंधाची समस्या म्हणुण विषय निवडलेला आहे.

**संशोधनाची उदिष्ट्ये :-**

1) भारतीय राजकारणातील पक्षांतराच्या इतिहास अभ्यासणे
2) भारतीय रार्जकिय पक्षांतराच्या जीवनाचा अभ्यास करणे.
3) पक्षांनतर बंदी कायद्याच्या स्थीतीवर प्रकाश टाकणे.
4) पक्षांतराचा भारतीय राजकारणावर होणाच्या परिणामाचा आढावा घेणे.
5) 100 वा अनुसुचीतल उणीवा चा अभ्यास करणे

**गृहितके :-**

1) भारतीय राजकारणात पक्षनिष्ठा राहीली नसुन नोट निष्ठा वाढली आहे.
2) पक्षांतर बंदी कायद्यातील अनेक उनिवा मुळे अस्थीर राजकारणास चालना मिळाली आहे.
3) गठबंधनावर पक्षांतर बंदिकायदा होण्याची आवश्यकता आहे.
4) पक्षांतरामुळे लोकशाहीतील राजकीय नित्तीमत्तेचा ऱ्हास होताना दिसुन येते.
5) पक्षांतर बंदी कायद्यातील उणीवा दुर करुन कायद्यास अजुन मजबुत बनवणे आवश्यक आहे.

**तथ्य संकलन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधाच्या तथ्य संकलनासाठी दुश्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. विविध ग्रंथालयातील ग्रंथ तसेच वर्तमानपत्रे, इटरनेट वरील मासिकाद्वारे प्रकाशित सदर विषया संदर्भातील सुचक माहिती याचा अवलंग करण्यात आलेला आहे.

**पक्षांत्तराची कारणे :-**

**1) काँग्रेस पक्षाचे प्रभुत्व संपले :-**

सन 1985 पासुन स्वातंत्र्य आंदोलन काळात तसेच स्वातंत्र्यानंतर सन 1967 पर्यंत देशात काँग्रेस पक्षाचे प्रभुत्व होते. प. ज. नेहरु सारखे प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेले नेतृत्व काँग्रेसला मिळाले होते त्यामुळे सन- 1952, 1957, 1962 चा दिन लोकसभेच्या निवडनुका मध्ये काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले पण त्यानंतर प. न. नेहरु यांच्या निधनामुळे भारतीय राजकारणात नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली. मोररजी देसाई हे नेहरुनंतर काँग्रेस मधील मोठे नेते होते पण त्यांना डावलुन काँग्रेसचे अध्यक्ष कामराज नडार यांनी लालबहादुर शास्त्री यांना देशाचे पतंप्रधान बनविले. काँग्रेस पक्षात फुट पटली. पुढील काळात श्रीमती इंदिरागांधी यांच्य नेतृत्वामुळे काँग्रेस मधील वरिष्ठ मंडली नाराज झाली त्यामुळे सिंडिकेट असे गट निर्माण झाले काँग्रेस पक्षावरील निष्ठा कमी झाली.

**2) सत्ता व मंत्रीपदाचे प्रलोभन :-**

स्वातंत्र्याच्या सुरुवातील मद्रास राज्यामध्ये सरकार बनाविण्याठी राज्यपालांनी श्री राजगोपाला चारी यांना आमंत्रण दिले त्यावेळी इतरपक्षातील 25 सदस्य काँग्रेस पक्षात समाविष्ट झाले त्यामंळे कॉंग्रेसचे सरकार तामीळनाडु राज्यात अस्तीत्वात आले. सत्ताव मंत्रीपदाचे प्रलोभण त्या काँग्रस बदल मंत्र्याना देण्यात आलेले होते. येवु नये पक्षांतराची सुरुवात भारतीय राजकारणामध्ये वाढत गेली. सन 1967 मध्ये तर पक्षातंराच्या घटनानी भारतीय राजकारणात खळबळ माजविली. हरियांना राज्यतील हसनपुर मतदार संघातील विजयी उमेदवार श्री. गयालाल यांनी एकाच दिवसात तिन वेळेस पक्षांतर केले. सुरुवातील संयुक्त मोर्चा मध्ये असलेल्या श्री गयालाल यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला नंतर काही क्षणात पुन्हा संयुक्त मोर्चा मध्ये गेले नंतर 09 घंट्यानी परत काँग्रेस पक्षात समाविष्ट झाले.

1969 ला 32 वेळेस सरकार अस्थीरतेमुळे कोसळली. सन 1977 -80 कालखंडात देखील सत्ता आणि मंत्री पदासाठी मोठ्या प्रमाणात पक्षांतर करण्याच्या घटना घडल्या त्यामुळे राजीव गांधी यांच्या काळात 1985 ला 63 वी घटना दुरुस्ती करुन पक्षांतर बंदी कायदा करण्यात आला. सन 2022 ला महाविकास आघाडी मधील शिवसेना पक्षातील 40 आमदारांनी भाजपा ला येऊन मिळाले त्यामुळे मोठे पक्षांतरन घडुन आले महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे सरकार कोसळले.

शिवसेनेचा विरोधात सर्वोच्च न्यायालयात याचीका दाखल केली. खासदार आमदारांना मोठ्या प्रमाणात पक्षांतरासाठी मंत्री पदाचे प्रलोभणे देण्यात येतात त्याशिवाय विविध आयोगांचे अध्यक्ष बनविण्यात येते.

**3) केंद्रीय सत्ताधारी पक्षाचे प्राबल्य :-**

भारतीय राजकारणात बहूमत असलेल्या पक्षाचे शासन अस्तीत्वात येते. घटनेच्या चौकटीत राहुन शासनकारभार करणे प्रत्येक सत्ताधारीपक्षाला बंधनकारक असते पण सत्ताधारी पक्ष आपल्या अधिकारांचा उपयोग करुन विरोधी पक्षातील सदस्यांना फोडुन घटकराज्यातील विरोधीपक्षाची सत्ता अस्थीर करतो. 1952 च्या प्रथम निवडणुका मध्ये कॉंग्रेसपक्ष बहुमताने निवडुन आले असले तरी त्याला अपवाद म्हणुन तामीळनाडु केरळ हे घटकराज्य ठरले तेथे कम्युनिष्ठ पक्ष सत्तेवर आला. सन 1959 ला काँग्रेसने तथील सरकार पाडले व राष्ट्रपत्ती राजवट लागु केली. त्यामुळे घटकराज्यातील विरोधी पक्षाचो सत्ता टिकुन ठेवुन पुढील काळात अवघड झाले.

विरोधी पक्षवर मोठ्या प्रमाणात कारवाईचा बडगा उगारुन पक्षात फुट पाडल्यागेल्या यासाठो मोठ्या प्रमाणात C.B.I/I.T./E.D.या वापर शस्त्र म्हणुन केला जातो.

**4) पक्ष नेतृत्वावरील निष्ठेचा अभाव :-**

देशात पक्षांतराच्या समस्येचे महत्वाचे कारण पक्षाच्या नेतृत्वावर सदस्यांची निष्ठा नसते. विविध घटका मध्ये समन्वय स्थापीत करण्याच्य अभावाने पक्षांतरण घडुन येते. स्वातंत्र्यानंतर नेहरु, इंदिरागांधी राजीव गांधी चा नेतृत्वामुळे काँग्रेस पक्षाला बळकरी सदस्यांची निष्ठा राहीली नाही

**5) निवडनुकी साठी पक्षाचे टिकीट न मिळणे :-**

लोकसभा/ विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी राजकीय पक्षांना मोठा निधी द्यावा लागतो. त्यांनाच निवडणुकांमध्ये उमेदवारीले तिकीट दिले जाते. त्यामुळे जनतेच्य समस्या सोडविनारे पक्षांचे खरे सदस्य बाजुला डावलले जातात. त्यामुळे हे सदस्य अपक्ष म्हणुन निवडनुकीमध्ये उमेदवार म्हणुन उभेराहतात. निवडणुकीत विजयी झाल्यावर सत्ताधारी पक्षात जातात किंवा त्यांना बाहेरुन पाठींबा देतात.

**6) शक्तिशाली लॉबींग व दबाव गटाची भुमीका :-**

लोकसभा - विधानसभा निवडणुका लढविण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च लागतो. नोटा शिवाय निवडणुका जिंकणे शक्य नाही. म्हणुन निवडणुक तंत्र म्हणजे नोटतंत्र बनत चालले आहे. उमेदवारांना मोठ्या प्रमाणात पक्षाचा व आपल्या उमेदवारीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आजल्या मतदार संघात पैसा खर्च करावा लागतो. मोठ्या प्रमाणात जाहीरातबाजी करण्यात येते. त्यासाठी मोठ्याप्रमाणात लॉबींक केली जाते. हा सर्व पैसा खर्च करणारा दबावगट असतो. कारण आपल्या हिताचे संरक्षण करणे, प्रत्येक दबाव गटाचे कार्य असते त्यासाठी सत्ताप्राप्त झाल्यावर त्या राजकीय पक्षावर आपले हितसाध्य करण्यासाठी दबाव टाकतो. चा दबावामुळेच पक्षातराचे प्रमाण देखील वाढवलेले दिसुन येते.

**7) राजकीय नेत्यामध्ये परस्पर मतभेद :-**

कॉंग्रेस पक्षातील नेत्यामध्ये व्यक्तीगत मतभेद होते. त्यामुळे कॉंग्रेसपक्षातुन बाहेरपडुन अनेक नेत्यांनी वेगळ्या राजकीय पक्षाची स्थापना केली. स्वातंत्र्याच्या सुरुवातीस कम्युनिष्ट पक्ष, जनता दल, राष्ट्रीयजनतादल, जनसंघ, अनाद्रमुक कळघम. तेलगु देसम, अकाली दल, भारतीय जनता पक्ष अशा विविध राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षाची स्थापना झाली. या पक्षामध्ये पक्षश्रेष्ठसाठी संघर्ष होतो या संघर्षातुन पक्षांतरन केले जाते. राष्ट्रवादी कॉंग्रेस हे त्यांचे एकमोठे उदाहरण आहे.

श्री. राजीव गांधी यांच्या निधनानंतर कॉंग्रेस पक्षातील वरिष्ठ मंडळीनी कॉग्रेसवर वर्चस्व प्रस्थापीत केले त्यामध्ये श्री. शरद पवार हे एक प्रमुख नेतृत्व होते. परंतु श्रीमती सोनिया गांधी यांच्या अचानक कॉंग्रेस प्रवेशामुळे कॉंग्रेस पक्ष संघटनेचे चित्र बदलले कॉंग्रेस नेतृत्वात मतभेद निर्माण झाले त्यामुळे श्री शरदपवार यांनी कॉंग्रेस मधुन बाहेर पडुन नवीन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची स्थापना केली. तसेच शिवसेने बाळासाहेबा नंतर नेतृत्वामध्ये अंतर्गत मतभेद असल्यामुळे श्री. राजठाकारे यांनी बाहेर पडुन नवीन महाराष्ट्र नवनिर्माण सेना देखील सेने मधुन बाहेर पडले.

आज राजकीय नेतृत्वामध्ये अंतर्गत परस्परमतभेद हे पक्षांतराचे प्रमुख कारण दिसते.

**पक्षांतर बंदी करण्यासाठी कायदा :-**

सन 1968 मध्ये सर्वप्रथम संसद सदस्य वेंकट सुबैथा यांच्या कडुन या समस्येवर तोडगा काढण्यासाठी गैरसराकारी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

24 नोव्हे 1969 ला हे विधेवक लोकसभेकडुन पारित करण्यात आले. फेब्रु 1969 मध्ये पक्षांतर बाबत अभ्यास करुन त्यावर उपाय सुचविण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री श्री. वाई. बी. चव्हाण यांच्य अध्यक्षतेखाली एक समिती बनविण्यात त्या समितीने शिफारशी केल्या.

**जनता पार्टीद्वारे प्रयत्न :-**

सन 1978 मध्ये 48 वे संशोधन विधेयक मांडण्यात आले. परंतु त्याच पक्षाचे महासचिव श्री. मधुलिमये यांच्या विरोधामुळे हे विधेयक पारीत झाले नाही.

**52 वे संशोधन विधेयक :-**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात पदार्पन करतांना विकसित भारत देश घडविण्यासाठी शासन सत्तेचे स्थैर्य हा महत्त्वपूर्ण बाब आहे. या करिता देशातील विविध राष्ट्रीय व प्रादेशिक राजकिय पक्षामध्ये सुसंवाद-सहकार्य निर्माण करणे गरजेचे आहे. लोकसभा व विधानसभेतील सदस्यांच्या पक्षांतर करण्याची मोठी समस्या देशात राजकिय अस्थीरता निर्माण करत आहे यासाठी कायद्याच्या दृष्टीने योग्य उपाय करणे आवश्यक आहे.

खासदार व आमदारांच्या भ्रष्ट आचरणाला आळा घालण्यासाठी श्री. राजीव गांधी यांच्या कालखंडात सन 1985 मध्ये 52 वी घटना दुरूस्ती करण्यात आली. या घटना दुरूस्तीने भारतीय राजकारणात मोठा बदल घडवून आणला हे पहिले मोठे पाऊल होते.

**52 व्या घटनादुरूस्तीची उद्दिष्टे :-**

52 व्या घटना दुरूस्तीच्या पहिला उद्देश देशाच्या संविधानिक तत्त्वांना आणि लोकतंत्राच्या मुल्यांना प्रत्यक्ष कमी करणाऱ्या राजकिय पक्षांतराच्या वाढत्या समस्येला पायबंद घालने हा होता. हि घटना दुरूस्ती खालील उद्दिष्टांसाठी करण्यात आलेली आहे.

1) पक्षांतरातून राजकिय भ्रष्टाचार रोखणे हा त्याचा मुळ उद्देश आहे या कायद्यामुळे सर्वदा व्यवसायिक आणि राजकिय घडामोडी भ्रष्टाचारमुक्त करण्यामध्ये महत्त्वाची भुमिका बजावेल.
2) राजकिय स्थैर्याला बळकटी मिळेल.
3) प्रस्तावित केलेल्या पक्षांतराविरोधी कायद्यामुळे राजकिय नेत्यांना मोठ्या प्रमाणात त्यांच्या पक्षाला जबाबदार धरण्यास सहकार्य होईल. त्यामुळे ते त्यांच्या पक्षाची एकनिष्ठ व जबाबदार राहतील.
4) पक्षांतरात सहभागी असलेल्या सर्व सदस्यांचा शोध घेणे आणि त्यांवर कठोर कारवाई करणे परिणामी पक्षांतरण करणारे राजकिय नेते त्यांच्या पदावरुन अपात्र ठरतील त्यांच्या चांगला प्रतिबंधक आणि नागरिकांच्या हक्कांचेही संरक्षण होईल.
5) राष्ट्रीय विशेषतः प्रादेशिक पक्षांच्या हिताचे संरक्षण करणे कारण प्रादेशिक पातळीवरील पक्षांनमध्ये पक्षांतरण हि मोठी समस्या बनली आहे. छोट्या पक्षातील बहुसंख्य राजकिय नेते राष्ट्रीय पक्षामध्ये सहभागी होतात.
6) पक्षांतर विरोधी कायदा भारतीय संविधानाच्या दहावी अनुसूची म्हणून जोडण्यात आली. राजकिय स्थीरता व नागरिकांच्या विश्वासाचे संरक्षण करण्यासाठी रार्जकिय पक्षांतरला परावृत्त करण्यासाठी कायदेशीर बदल करण्यात आला.

**अध्यक्षांना अधिकार :-**

राजकिय पक्षांतराच्या कारणावरुन कोणत्याही मंत्र्याला अपात्र ठरविण्याचा अधिकार संसद व विधीमंडळाच्या अध्यक्षांना आहे. त्यांचे निर्णय न्यायालयीन पूर्नविलोकनाच्या अधिन ठेवण्यात आलेले आहेत.

मंत्र्याच्या पक्षांतराचा निर्णय सभापतींनी किती काळात द्यावा या बाबत कोणतीच कालमर्यादा दिलेली नाही. हा त्याचा विवेकाधीन अधिकार भरुन आहे. संसद व विधीमंडळाच्या सभागृह अध्यक्षाला निपक्षपाती भुमिके बाबत प्रश्न उपस्थित होतात.

**अपात्रतेची कारणे :-**

1) निवडुन आलेले सदस्य आपल्या स्वेच्छेने रार्जकिय पक्षांची संलग्नता किंवा सदस्यत्व सोडून देतात तेंव्हा त्यांना पक्षांतराच्या कारणास्तव अपात्र घोषीत केले जाऊ शकते.
2) जर निवडुण आलेल्या सदस्यांनी आपल्या पक्षाच्या विरुद्ध सभागृह मतदान केले किंवा नाही तर त्याच अपात्र ठरविले जाऊ शकते त्यालाच पक्षाची व्हीप अथवा आदेश असे ही म्हणतात. जर निवडुन आलेल्या सदस्यांनी मतदान न केल्याच्या कारणांचा तपशील
3) जेंव्हा एखादा सदस्य प्रारंभी अपक्ष उमेदवार म्हणुन लोकसभा विधानसभा निवडणुक लढावितो परंतु नंतर दुसऱ्या पक्षात प्रवेश करतो तेंव्हा त्याला पक्षातंरासाठी जबाबदार - धरले जाऊ शकते ज्यामुळे त्याला त्यांचे पद धारण करण्यास अपात्र ठरविले जाऊ शकते.
4) ज्या वेळेस नार्मानिर्देश सदस्य सहा महिण्याचा कालावधी संपल्यानंतर इतर रार्जकिय पक्षात प्रवेश घेतो त्यावेळेस त्यास अपात्र घोषीत केले जाऊ शकते कारण ते स्पष्ट रुपात पक्षांतरन असते.

**पक्षांतर विरोधी फायद्याला अपवादः-**

या कायध्याने वैयक्तीक पक्षांतरास संमती बसली तरी आमदार/ खासदारांच्या गटाला त्यांना दंडा शिवाय इतर पक्षामध्ये समाविष्ट होण्याची परवानगी आहे. एक तृतियांश सदस्यांनी केलेल पक्षांतर हे विलीनाकिरण मानले जाते. हि एक मोठी समस्या राजकीयय सत्तेमध्ये असलेल्या पक्षांसाठी झाली आहे.

या समस्येवर उपाय म्हणुण 91 वा घटना दुरुस्ती 2003 रोजी करण्यात आली या घटना दुरुस्ती 2/3 खासदार / आमदारानी आपला गटबनवुन विलीनीकरण करता येऊ शकते हि एक अयोग्य प्रथा म्हणुन राष्ट्रसमोर उभी टाकली आहे पार्टी तुन काढुन टाकले तर त्याचे सदस्यत्व रद्द होत नाही. निवडनुक जिंकलेल्या उमेदवारावरच हा कायदा लागु आहे.

**52 व्या घटना दुरुस्तीशी संबधीत ऐतिहासिक न्यायालयीन निर्णय :-**

केशवानंद भारती विरुद्ध भारतीय संघ 1973 च्या न्यायालयीन पूर्नविलोकन हा राज्यघटनेच्या मुलभूत रचनेच्या महत्वाचा भाग आहे. आणि तो कोणत्याही परिस्थीतीत न्यायालयापासुन हिरावुन घेतल्या जाऊ शकत नाही असा निर्णय देण्यात आला होता. यामुळे सभागृहाच्या सभापतीच्या निर्णय राहण्यासाठी पुर्णपणे वैध्य आहे.

**राजेद्रसिंह राणा विरुद्ध स्वामी प्रसाद मौर्य आणि इतर (2007):-**

न्यायाल्याने उत्तरप्रदेश राज्यमध्ये निर्णय दिल्यामुळे लोकसभा/विधानसभा सदस्याची अपात्रतेच्या कारणास्तव स्वेच्छेने सदस्वत्व सोडणे या शब्दाच्या अर्थाचा विस्तार झाला.

एखाध्या राजकीय पक्षाचा निवडुन आलेला सदस्य राज्यपालांना निवेदन देतो ज्यामध्ये त्याने विरोधी पक्षाचा नेत्याला बोलावण्याचा उलेख केला आहे तेव्हा असे मानले जाते बोलावण्याचा उलेख केला आहे. तेंव्हा असे मानले जाते कि जाणून बुजुनत्या मुळ पक्षाच्या सदस्यत्व समर्थन केलेले आहे. या मध्ये न्यायालयीन पुर्नविलोकन कनावर सुद्धा भर देण्यात आला होता. न्यायालयाचा हा निर्णय विधीमडंळाच्या सदस्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयावर बेधनकारक असेल.

**मन्नादी सत्यनाराण रेड्डी विरुद्ध आंधप्रदेश विधानसभा आणि इतर (2009) :-**

या खटल्यामध्ये अध्यक्षा च्या अधिकार क्षेत्राबाबत प्रश्न उपस्थीत केले. आध्रंप्रदेश च्या उच्च न्यायालयाने स्पष्ट सांगीतले होते की. दहाण्या अनुसुचीमध्ये कोणताही तरतुद नाही ज्याचे सभापतींना कोनताही निर्णय घेण्यास पुर्णपर्ण प्रतिबंध केला. त्यापुढे न्यायाल्याने असा निर्णय दिला कि न्यायाल्याकडे न्यायिक पुर्नविलोकन उपलब्ध नाही आणि वेळेवर कारवाई करण्यास देखील परवानगी दिली जाणार नाही कारवाईच्या टप्यावरही कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करण्याणी परवानगी नाही विवाद सोडविण्यासाठी शक्ती, जी अध्यक्षांकडे दिलेली आहे ती न्यायिक शक्ती आहे. त्यामुळे त्यांनी दिलेल्या निर्णय अंतिम मानला जाईल.

**केराम मेघचंद्र सिंग विरुद्ध मणिपुरचे माननीय सभापती (2020):-**

दहाव्या अनुसुचिसध्ये वर्णन करण्यात आलेल्या पक्षांतर विरोधी कायद्यावर टिका करणाराहा एक निकाल आहे. न्यायाधीस नरिमन म्हणतात कि, पक्षांतर विरोधी कायदा आधुनिक काळात दोषासह आहे आणि कोणत्याही व्यक्तिला अपात्र ठरविण्याची संपुर्ण शक्ती सभापतीच्या हातात केंद्रीत आहे.

**10 व्या अनुसुचीतील उणिवा:-**

1) असहमती व दलपरिर्तन या मधील अंतर अस्पष्ट आहे.
2) मोठ्या राजकिय पक्षांच्या निर्मीतीस पाठींबा दिली.
3) विधीमंडळा बाहेर केलेल्या गैरकारभारावरुन सदस्यत्व रद्द करत नाही तशी व्यवस्था नाही विरोधकांना कमकुवत बनविन्यात येते हे लोकशाही विरुद्ध आहे.
4) विधीमंडळ/ संसद अध्यक्ष विवादास्पष्ट भुमिका घेऊ शकतात त्या बाबत स्पष्टता नाही.

**वर्तमान परिस्थीती :-**

22 जुन 2022 रोजी महाराष्ट्रात शिवसेनेच्या विधानसभा सदस्यांनी शिंदे त्यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी विरुद्ध भारतीय जनतापक्ष पक्षास आपला 38 आमदारांना पाठींबा दिला त्यामुळे हे सामुहीक पक्षांतरण झाले या बाबत सर्वोच्च न्यायाल्यात शिवसेनेने याचिका दाखल केलेली आहे.

2021 मध्ये कॉंग्रेसच्या 17 पैंकी 12 आमदार तृणमुल कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला परिणामी आमदारांच्या या सामुहिक पक्षांतरामुळे त्यांची अपात्रता झाली नाही कारण त्या ठिकाणी ते विलिणीकरणाच्या अंतर्गत झाले

यामध्ये संद्याच्या राजकारणामध्ये अस्तीरता निर्माण झालेली आहे नैतिक आदर्श मुल्यांमध्ये घसरण झालेली आहे. नवीन लहान - लहान पक्षांचा उदय होत आहे. मंत्रीमंडळांचा अनावश्यक विस्तसार केला जात आहे. जनकल्याणाकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे सध्याच्या काळात लोकशाहीवरील श्रद्धा विश्वास कमी होतांना दिसुन येत आहे.

**निष्कर्ष :-**

1) आमदार/ खासदार सदस्यांला पक्षांतरासाठी अपात्र ठर्रावण्याचा निर्णय स्वतंत्र आयोग किंवा निवडनुक आयोगाने घेतला पाहीजे कारण सभापतीच्या बाजुने कोणताही पक्षपात होण्याची कारण शक्यता कमी होईल निवडणुक आयोगाने व्यापक भुमिको घ्यावी.
2) असा निर्णय देण्यासाठी सभापतींना वेळेत निर्बंध घालावे जेनेकरुन पक्षाला तसेच ज्या नागरिकांनी त्यांना निवडुन दिले त्यांची निराशा घेऊ नये.

3) आमदार/ खासदारांच्या भाषन व अभिण्यक्ति स्वातंत्र्याचा संकोच होऊ नये.
4) राजकिय पक्षांनी आपली अंतर्गत यंत्रना अधिक मजबुत करावी.
5) आमदारांचे अधिकार व रार्जाकिय पक्ष जसे व नागरिकांचे हित यामध्ये प्रभावी संतुलन साधण्याची आवश्यक्ता आहे.
6) हा कायदा राजकिय पक्षावर लागुनाही अनुशासनाच्या नावावर पक्षाचे स्वामीत्वाची स्थीती निर्माण होते.
7) न्यायालय व विधीमंडळ यांच्यात संशोधन व्हावे.
8) राष्ट्रपती व राज्यपाल यांनी देखील वेळ प्रसंग लक्षात घेऊन सदसद विवेक बुद्धीने निर्णय घ्यावा.

**संदर्भ ग्रंथसुची :-**

1) कश्यप सुभाष :- हमारा संविधान, नॅशनल बुकटुस्ट इंडिया, 2009
2) ओझा एन. एन :- भारतीय राजव्यवस्था, क्रॉनिकल बुक्स नई दिली,
3) https!// www. Meg. Gov. in/ Images/pelr// s10 pdf...
4) घांगरेकर चि.ग. भारतीय राजकिय व्यवस्था, दत्तसन्स प्रकाशन, नागपुर 1996
5) जोशी. प. ल. भारतीय संविधान - शासन आणि राजकारण , विद्याप्रकाशन नागपुर, 1988.
6) देशमुख बी.टी भारतीय शासन व्यवस्था पिंपळापुरे पब्लिरार्स नागपुर 1978.